## प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो...

सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करत असताना कर्जतचे माजी सरपंच व प्रथम नगराध्यक्ष मा. नामदेव (देवा) राऊत व तत्कालीन सचिव कै. आनंद कल्याणकर (टेलर) तसेच विद्यमान सचिव वैभवशेठ छाजेड यांनी ग्रामीण भागातील वाढती शैक्षणिक गरज विचारात घेऊन समाज प्रबोधन संस्थेची स्थापना सन १९९८ साली केली.

समाज प्रबोधन संस्था, कर्जत, ता. कर्जत, जि.अ.नगर या संस्थेने ग्रामीण भागामधील शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आणि विशेषतः हुशार, होतकरू, व सामान्य स्तरातील मुलां-मुलींचे शिक्षणाची सोय व्हावी या हेतुने सन - १९९९ साली कर्जत येथे समर्थ माध्यमिक विद्यालय सुरु केले. तसेच सन २००३ साली संस्थेने उच्च माध्यमिक विद्यालय (कला व विज्ञान) सुरु केले. सन २०१४-१५ साली भारती पब्लिक स्कूल (इ.१ ली ते ५ वी सेमी) व सन २०१६ साली ग्लोबल इंग्लिश मेडियम स्कुल (सी.बी.एस.सी.) ची स्थापना केली. तसेच सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात रोकडेश्वर माध्यमिक विद्यालयाची नांदगांव येथे स्थापना केली.

संस्थेने रक्तदान शिबीर, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, बेटी बचाव, जनजागृती इ. उपक्रम राबविलेले आहेत. संस्थेच्या अध्यक्षांच्या वाढदिवसानिमित्त शासकीय व खाजगी वसतिगृहातील गोर-गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप दरवर्षी करण्यात येते.

समाज प्रबोधन संस्थेने समर्थ विद्यालयातील गरीब कुटूंबातील होतकरू व हुशार मुलांच्या सर्व प्रकारचा शैक्षणिक खर्च संस्था करत आहे. विद्यालयात गुणवंत





खेळाडू निर्माण झालेले आहेत. जिल्हा विभाग, विभागीय विभाग, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तरावर विविध खेळाडूंची निवड झालेली आहे. इ. १० वी व १२ वी परीक्षांचे निकाल वैयक्तिक निकाल ९०% च्या पुढे आहेत. संस्थेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी मेडिकल, इंजिनिअरिंग, बी.एस्सी. ॲग्री, डी.एड. या शाखांमध्ये उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात काम करत आहेत.

उच्च शिक्षण देणे एवढेच महाविद्यालयाचे उद्दिष्ट नसून परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक लोकजीवन समृध्द होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी परिस्थिती निर्माण करणे, त्यांच्या जीवनाला निश्चित अर्थ प्राप्त करून देणे, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनींवर सुसंस्कार करून जीवन मुल्यांचे महत्व पटवून देऊन विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा मानस ठेवून महाविद्यालयाची स्थापना संस्थेने केली आहे.

महाविद्यालयात कला, विज्ञान या दोन्ही शाखेच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे.



Scanned with OKEN Scanner

## * शैक्षणिक सुविधा *

### १) ग्रंथालय :-

ग्रंथ हेच गुरू या प्रमाणे महाविद्यालयात ग्रंथालय विभाग कार्यरत आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमाशिवाय इतर संदर्भग्रंथ, नियतकालिके, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन पुस्तके, कथा कादंबरी, काव्य चरित्र इत्यादी. तसेच दै. वर्तमान पत्रासहित विविध ग्रंथ संपदा उपलब्ध आहे. महाविद्यालयामार्फत पुस्त पेढीची सोय उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थी विद्यार्थीनींसाठी वाचन कक्षाची सोय.

### २) व्याख्याने व चर्चासत्रे :-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयात नामवंत व तज्ञ व्यक्तींची व्याख्याने महाविद्यालयात आयोजित केली जातात. तसेच विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास व्हावा व त्यांच्यात सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी या दृष्टीने विविध विषयांवरील परिसंवाद व चर्चासत्रे तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात आयोजित केली जातात.

### ३) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) :-

महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा व त्याच बरोबर त्यांना समाजसेवेची संधी मिळावी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे (N.S.S.) पुणे विद्यापीठ व महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने विद्यार्थी / विद्यार्थीनींचे पथक महाविद्यालयात कार्यरत आहे.





### ४) क्रीडा विभाग :-

महाविद्यालयात मुला-मुलींना शारीरिक शिक्षण देऊन बौध्दिक विकासाबरोबर शारीरिक क्षमताही वाढावी म्हणून महाविद्यालयातील विविध खेळांची व विविध खेळाच्या मैदानाची सोय आहे. विद्यापीठामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या विविध स्पर्धामधून भाग घेऊन आपले क्रीडा नैपुण्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार खेळाची निवड करता येईल.

### ५) कला मंडळ :-

मनोरंजनाद्वारे शिक्षण यासाठी संगीत, नाट्य, नृत्य, गायन, पोवाडे, कथाकथन इ. कार्यक्रम कलामंडळामार्फत महाविद्यालयात राबवले जातात. वार्षिक गॅदरिंगचे आयोजन केले जाते. तसेच महाविद्यालयात थोर व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथीचे आयोजन केले जाते.

### ६) इमारत :-

संस्थेने महाविद्यालयासाठी स्वतंत्र सुसज्ज इमारत बांधली असून, त्यामध्ये सुसज्ज ग्रंथालय, संगणक विभाग, प्रयोगशाळा, वर्ग व्यवस्था कार्यालय इ. स्वतंत्रपणे पूर्तता केली आहे.

### ७) अभ्यासिका :-

विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याच्या दृष्टीने ग्रंथालयातच सुसज्ज फर्निचर सह अभ्यासिकेचे नियोजन महाविद्यालयाने केले आहे.



Scanned with OKEN Scanner

८) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासाबरोबर स्पर्धा परीक्षांत उतरावे यादृष्टीने स्पर्धा परीक्षा मोफत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नोकरीची शाश्वती नसल्याने स्वयंरोजगार व स्वव्यवसाय मिळावा म्हणून व्यवसाय मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयात सुरू करत आहोत.

९) विद्यार्थी सुरक्षा विमा योजना :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी सुरक्षा विमा योजने अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अपघाती निधन झाल्यास किंवा अपघाताने जखमी झाल्यास नियमानुसार फायदे मिळवून दिले जातील.

*** विद्यार्थी कल्याण मंडळ ***

१०) कमवा व शिका योजना (Earn & Learn) :-

केवळ आर्थिक अडचणींमुळे महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांस महाविद्यालयात भरपूर सवलती उपलब्ध आहेत. केवळ आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी कमवा आणि शिकवा योजना आहे.





श्रम करून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेद्वारे कामाची संधी उपलब्ध करून दिली जाते. श्रमाच्या मोबदल्यात व महाविद्यालयाच्या आर्थिक सहाय्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुकर होते.

११) विशेष मार्गदर्शन योजना :-

विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शनपर योजना महाविद्यालयात कार्यरत आहे. तसेच इंग्रजी संभाषण कौशल्य शिकण्याचे नियमित तासिका घेतल्या जातात.

१२) विवेकवाहिनी :-

विद्यार्थ्यांना कृतिशील वैज्ञानिक जाणीव व विवेकी मूल्य विचार देणेसाठी विवेक वाहिनी हा उपक्रम महाविद्यालयात चालू आहे.

१३) समर्थ भारत अभियान :-

भारताचे महामहिम माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी जे महासत्ताक भारताचे स्वप्न दाखविले आहे. त्याच्या परिपूर्णतेसाठी पुणे विद्यापीठाचे तत्कालिन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी समर्थ भारत अभियान सुरू केले.

महाविद्यालयाने समर्थ भारत अभियान अंतर्गत युवाशक्तीला रचनात्मक आणि विधायक कार्याकडे वळविण्यासाठी गाव दत्तक घेतले जाते. वेगवेगळ्या कृतीगटाची निर्मिती करण्यात आली आहे. त्या कृतीगटाच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.



Scanned with OKEN Scanner

### १४) बहि:शाल शिक्षण केंद्र :-

या केंद्रांतर्गत विविध समाजाभिमुख उपक्रम महाविद्यालयात राबविले जातात. ज्ञान विस्तार कार्यक्रमांतर्गत विविध तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात.

### १५) विद्यार्थी / विद्यार्थीनींना व्यक्तिगत विकासासाठी :-

soft Skill Development योजना राबविली जाते. त्यात दहा दिवस विविध विषयावर व्याख्याने व ग्रुप चर्चाचे आयोजन केले जाते.

### १६) पालक व माजी विद्यार्थी संघ :-

विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहकार्य करण्याचे उद्देशाने आम्ही ही योजना अवलंबिली आहे. संबंधित प्राध्यापक हे विद्यार्थ्यांचे पालक असतात. ते या विद्यार्थ्यांच्या अभ्यासेत्तर कार्यालयातील अडीअडचणी सोडविण्यास मार्गदर्शन करतात. या प्रत्येक गटाची महिन्यातून दोनदा मिटींग घेतली जाते.





### * विद्यार्थ्यांस मिळू शकणाऱ्या विविध सवलती व शिष्यवृत्ती *

| अ.नं. | शिष्यवृत्तीचे नांव | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | भारत सरकारची शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता) | मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थीनी मार्च / एप्रिल २०१८ परीक्षेत उत्तीर्ण होऊन वरीष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल त्यांनी अर्ज करावयाचे आहेत. ही सवलत एकाच कुटुंबातील दोन आपत्यांना मिळू शकते. मुलींसाठी संख्येचे बंधन नाही. उत्पन्न मर्यादा रू. एक लाखाच्या आत असावे. (एस.सी. रू. दोन लाख पर्यंत उत्पादन मर्यादा फ्रीशीटसाठी रू. सहा लाख पर्यंत त्यापुढे शिष्यवृत्ती नाही.) | १) मागील परीक्षा पास झालेल्या गुणपत्रिकाच्या साक्षांकित दोन प्रती २) इयत्ता १२ वी शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित दोन छायाप्रती ३) आई/वडील/पालक नोकरीत असल्यास कार्यालय प्रमुखाचा मागील वर्षातील उत्पन्नाचा मूळ दाखला (मुळ पगार + महागाई भत्ता + घरभाडे इ. सह) ४) नोकरीत नसल्यास तहसिलदार यांनी दिलेला मूळ उत्पन्न दाखला ) विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला दोन साक्षांकित छायाप्रती ६) वडील हयात नसल्यास मृत्यूचा दाखल्याची छायांकित प्रत ७) आई / वडील विभक्त असल्यास प्रतिज्ञापत्र व इतर पुरावे (कोर्टाचे) ८) शैक्षणिक खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट ९) मागील वर्षी ज्या महाविद्यालयात सवलत घेतली तेथील मंजूर आदेश क्रमांक १०) जिल्ह्यातील असल्यास पूर्वीच्या जिल्ह्यातील मा. समाज कल्याण अधिकारी वर्ग - १ यांचे प्रमाणपत्र ११) भारतीय स्टेट बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे. (कर्जत) |
| २ | बी. सी. फ्रीशीप (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी) | १) मागावर्गीय विद्यार्थ्यांना एक वेळ नापास झालेल्यांना फी सवलत मिळत नाही. २) उत्पन्न मर्यादा वार्षिक रू.१,००,०००/- च्या पुढे ३) तीन किंवा तीन पेक्षा जास्त अपत्य असल्यास लाभ मिळतो. | वरील प्रमाणे २ प्रती |



Scanned with OKEN Scanner

| अ.नं. | शिष्यवृत्तीचे नांव | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|---|
| ३ | राज्य सरकारची खुली गुणवत्ता | एच.एस.सी. परिक्षेत किमान गुण ७५% असावेत. या शिष्यवृत्तीचा लाभ तीन वर्षासाठी असतो. उत्पन्न मर्यादा वार्षिक रू.२५,०००/- | १) विहीत नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रिकेच्या दोन साक्षांकित छायाप्रती<br>३) मा. तहसिलदार यांचेकडील उत्पन्न दाखला |
| ४ | राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (पदवीपर्यंत) | एच.एस.सी. परीक्षेत किमान गुण ७५% असावेत. या शिष्यवृत्तीचा लाभ तीन वर्षासाठी असतो. उत्पन्न मर्यादा रू. एक लाख च्या आत असावे. अशा विद्यार्थ्यांची एच.एस.सी. बोर्ड निवड करते. त्याप्रमाणे फॉर्म महाविद्यालयात उपलब्ध होतात आणि ज्या महाविद्यालयात एच.एस.सी. परीक्षा दिली तेथून फॉर्म घ्यावा. | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रिकेच्या दोन साक्षांकित छायाप्रती<br>३) उत्पन्न दाखला तहसिलदार यांचे सहीचा<br>४) प्रतिज्ञापत्र ५) दाखला झेरॉक्स<br>६) फोटो दोन ७) जातीचा दाखला झेरॉक्स |
| ५ | अपंग शिष्यवृत्ती | जो विद्यार्थी ४० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व आलेले त्यांना फॉर्म भरता येईल. उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात आली असून उत्पन्न दाखला मा. तहसिलदार यांचे सहीचा असावा. | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) गुणपत्रिकेच्या दोन साक्षांकित छायाप्रती ३) मा. तहसिलदार यांचे सहीचा उत्पन्न दाखला मूळ व छायाप्रत ४) जिल्हा वैद्यकिय अधिकारी (सिव्हील सर्जन) यांचेकडील दिलेले अपंग प्रमाणपत्र २ साक्षांकित प्रती. |
| ६ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | १) आर्थिक दुर्बलता<br>२) सामाजिक मागासलेपणा<br>३) ग्रामीण पार्श्वभुमी<br>४) शैक्षणिक गुणवत्ता<br>५) इतर शिष्यवृत्यांद्वारे मिळणारे अर्थसहाय्य<br>६) देवदासी, वारांगणा आणि एड्सग्रस्त मुलींना विशेष प्राधान्य | १) विहित नमुन्यातील फॉर्म<br>२) उत्पन्न दाखला १,००,०००/- पेक्षा जास्त नसावा.<br>३) मार्कशीट झेरॉक्स<br>४) दाखला झेरॉक्स ५) फोटो<br>६) भारतीय स्टेट बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे.<br>७) महाराष्ट्र बँक |





## * प्रवेशासंबंधीचे नियम *

१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहिती पत्रक व्यवस्थित वाचावे.

२) प्रवेशासाठी महाविद्यालयाचा विहित नमुन्यातील अर्ज काळजीपुर्वक भरावा.

३) प्रवेश घेताना पासपोर्ट आकाराचे दोन फोटो आणावेत
(एक फोटो ओळखपत्रासाठी व एक फोटो प्रवेश अर्जावर)

४) इ.बी.सी. फी सवलतीसाठी विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश घेताना भरुन द्यावा.

५) मागास जमातीच्या विद्यार्थ्यांनी तालुका तहसीलदारांच्या सही असलेल्या जातीच्या दाखल्याची व उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत्येकी दोन प्रती पासपोर्ट फोटो आणावा. जिल्हा बदल असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र आणावे.

६) प्रवेश अर्जासोबत एच.एस.सी. परीक्षेचे मुळ गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला या दोन्हींच्या दोन झेरॉक्स कॉपीज आणाव्यात.

७) प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने पात्रता प्रमाणपत्र अर्ज भरावा त्यातील माहिती काळजीपूर्वक भरावी प्रवेश घेतल्यावर या अर्जातील माहितीत पुन्हा बदल करता येत नाही.

८) महाविद्यालयात शिक्षण घेताना विद्यार्थ्याने शिस्तिचे पालन करावे. अन्यथा प्रवेश रद्द करण्यात येईल. फर्निचर, बेंचेस / लॅब साहित्य इ. चे नुकसान केल्यास त्याची नुकसान भरपाई द्यावी लागेल.

९) विद्यापीठ परीक्षेस बसण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी ८०% वर्गात उपस्थिती असणे अनिवार्य आहे.



Scanned with OKEN Scanner

१०) प्रथम वर्षात प्रवेश घेताना प्रत्येक विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जाबरोबर वैद्यकीय अर्ज पूर्ण करून देणे.

११) विद्यार्थ्यांचा प्रवेश कमिटीच्या निर्णयावर अवलंबून राहील. प्रवेश कमिटी व प्राचार्यांची सही झालेनंतर प्रवेश अंतिम धरला जाईल.

१२) सर्व शाखांचे प्रवेश मेरिटनुसार / गुणवत्तेनुसार दिले जातील.

## * पात्रता प्रमाणपत्र *

१) प्रथम वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने पुणे विद्यापीठ पात्रता मिळविण्यासाठी रू.१००/- फी भरावी लागते. ही फी विद्यापीठाकडे पाठविली जाते, त्यात सवलत दिली जात नाही.

२) इतर राज्यातील हायर सेकंडरी इक्झामिनेशन बोर्ड अथवा इतर मान्यताप्राप्त अशा शिक्षण संस्थेची परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास पुणे विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र स्वतः आणावे लागेल. त्यासाठी त्याला पुणे विद्यापीठाच्या मा. कुलसचिवाकडे विहित नमुन्यात फी भरून वेळेत अर्ज करावा लागेल.

३) पुणे विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र मिळालेखेरीज कोणत्याही विद्यार्थ्यास विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.

४) पुणे विद्यापीठाखेरीज अन्य विद्यापीठाकडून अथवा संस्थामधून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुणे विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी महाविद्यालयातून विकत मिळणाऱ्या छापील नमुन्यात अर्ज करून प्रवेश





अर्जासोबत तो अर्ज महाविद्यालयाकडे द्यावा व अर्जासोबत खालील मूळ प्रती जोडाव्यात.

अ) स्थलांतर दाखला (टी.सी.) ब) उत्तीर्ण झाल्याचा दाखला

क) उपस्थितीचा दाखला ड) गुणपत्रक

## टी.सी. व मायग्रेशन बाबतच्या महत्वाच्या सूचना

१) विद्यार्थ्याने विद्यापीठ बदल केले असल्यास त्याने विद्यापीठ स्थलांतर (मायग्रेशन) सर्टिफिकेट मिळविणेसाठी आवश्यक अर्ज व इतर कागदपत्रांची त्वरीत पूर्तता करावी.

२) महाविद्यालय सोडून जाणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला समक्ष टी.सी. देता येणार नाही. अन्य महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्या महाविद्यालयाकडे टी.सी. परस्पर पाठविला जाईल.

## टी.सी. व मायग्रेशन बाबतच्या महत्वाच्या सूचना

१) विद्यार्थ्याने ओळखपत्र घेऊन त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी. त्याच्या आधारे त्याला आपले नाव ग्रंथालयात दाखल करता येईल.

२) ग्रंथालयाचे कामकाज सकाळी ९.३० ते २ व दुपारी ३ ते ६ या वेळेत राहील.

३) पुस्तके घेताना तपासून घ्यावीत पुस्तके खराब केल्यास अथवा गहाळ झाल्यास सदर पुस्तकाची दुप्पट रक्कम भरावी लागेल.



Scanned with OKEN Scanner

४) पुस्तके घेतल्यानंतर ७ दिवसांपूर्वी जमा करावे.

५) परीक्षेपूर्वी ग्रंथालयाकडून घेतलेली सर्व पुस्तके व इतर वाचन साहित्य ग्रंथालयात परत करून बाकी नसलेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

६) दारिद्र्य रेषेखालील व होतकरू विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना राबविली जाते.

## * शाखानिहाय विषय निवड पध्दती

### * कला शाखा (Arts)

*** अ) प्रथम वर्ष कला (एफ.वाय.बी.ए.)**

१) प्रथम वर्ष वर्गात खालीलप्रमाणे एकुण सहा विषय निवडावेत एकदा निवडलेल्या विषयात बदल करता येणार नाही.

२) सक्तीचे (आवश्यक) – इंग्रजी व शारिरीक शिक्षण

३) १) मराठी २) राज्यशास्त्र ३) इतिहास / समाजशास्त्र ४) भूगोल ५) हिंदी ६) मानसशास्त्र ७) अर्थशास्त्र किंवा ऐच्छिक इंग्रजी यापैकी पाच विषय निवडावेत.

४) ज्या विद्यार्थ्यांना विशेष स्तरावर इंग्रजी हा विषय अभ्यासवायचा आहे त्यांनी प्रथम वर्षासाठी ऐच्छिक इंग्रजी घेणे आवश्यक आहे.

*** ब) द्वितीय वर्ष कला (एस.वाय.बी.ए.)**

या वर्गासाठी खालीलप्रमाणे विषय निवडावेत.

१) सक्तीचे इंग्रजी





२) प्रथम वर्ष बी.ए. करीता निवडलेल्या पाच विषयांपैकी कोणतेही तीन विषय निवडावेत.

३) निवडलेल्या तीन विषयांपैकी एक विषय स्पेशल म्हणून निवडावा. स्पेशल विषयाचे तीन पेपर उरलेल्या विषयाचे जनरल पेपर व सक्तीचे इंग्रजी व पर्यावरण जाणीव जागृती असे एकूण सात पेपर अभ्यासक्रमात राहतील.

*** क) तृतीय वर्ष कला (टी.वाय.बी.ए.)**

या वर्गासाठी द्वितीय वर्षातीलच सर्व विषय कायम ठेवावेत.

### * विज्ञान शाखा (Science)

**अ) प्रथम वर्ष विज्ञान (एफ.वाय.बी.एस्सी.)**

सक्तीचा विषय : शारिरीक शिक्षण

१) रसायनशास्त्र २) भौतिक शास्त्र ३) गणित ४) प्राणिशास्त्र

५) वनस्पतीशास्त्र ६) भूगोल

**ब) द्वितीय वर्ष विज्ञान (एस.वाय.बी.एस्सी.)**

१) मराठी किंवा इंग्रजी (सक्तीचे)

२) प्रथम वर्षासाठी असलेल्या विषयांपैकी रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व पर्यावरण जाणीव जागृती हे विषय असतील.

**क) तृतीय वर्ष विज्ञान (टी.वाय.बी.एस्सी.)**

तृतीय वर्ष विज्ञान या वर्गासाठी रसायनशास्त्र (Chemistry) हा पेपर स्पेशल आहे.



Scanned with OKEN Scanner

## * महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार शिस्तिचे नियम *

१) प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःजवळ ओळखपत्र बाळगावे.

२) विद्यार्थ्यांनी सर्व तासिकांना नियमित उपस्थित रहावे. विद्यापीठ परीक्षेला बसण्यासाठी ८०% उपस्थिती असणे आणि परीक्षेपूर्वी प्रत्येक विषयाचे सर्व स्वाध्याय पूर्ण असणे अनिवार्य आहे.

३) महाविद्यालयात सभ्य वर्तन, शिष्टाचार, नम्रता, दक्षता इ. अपेक्षित आहे. तासिका नसेल तेव्हा विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत बसणे आवश्यक आहे. घरून येताना-जाताना प्रवासात (बसमध्ये व बस थांबा येथे) महाविद्यालयाच्या नावाला बाधा येईल असे वर्तन करणाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

४) मा. प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतीही सहल अथवा अन्य कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

५) महाविद्यालयाच्या कामकाजासंबंधी सूचना फलकावर वेळोवेळी लावलेल्या सूचना प्रत्येकाने काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

६) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान टाळावे अन्यथा त्या नुकसानाची दंडासह वसुली संबंधीतांकडून केली जाईल.

७) महाविद्यालयात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांना विद्यार्थ्यांनी हजर राहणे बंधनकारक आहे. अशा कार्यक्रमातून शिस्तीचा सहभाग आवश्यक आहे. या कार्यक्रमामध्ये बाधा उत्पन्न करणाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

कोणत्याही कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी संबंधीत नसणाऱ्या व्यक्तिला पूर्व परवानगीशिवाय आणता येणार नाही.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ (७) कलम ९५ अन्वये बेशिस्त वर्तन करणाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहील.

८) शासनाचा दि.१५/५/१९९९ चा अधिनियम क्र.३३ अन्वये रॅगिंग व बेशिस्त वर्तन करणाऱ्याविरूध्द कठोर कारवाई केली जाईल.

रॅगिंग - महाविद्यालयातील कोणत्याही अन्य विद्यार्थ्याकडून शारीरीक व मानसिक व भावनिक हानी पोहचत असेल, धास्ती, भिती अथवा लज्जेची भावना निर्माण होत असेल तसेच चिडविणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे वा टोचून बोलणे असे वर्तन रॅगिंग समजण्यात येईल. असे बेशिस्त वर्तन वा रॅगिंग करणाऱ्याविरूध्द अपराधि सिध्दतेनंतर -

१. दोन वर्षे कारावास व रूपये दहा हजारापर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते.

२. कलम ४ अन्वये अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकण्यात येते व पुढील ५ वर्षांकरीता कोणत्याही संस्थेत प्रवेश दिला जात नाही.

९) विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आवारात तंबाखू, पान, गुटखा खाण्यास / धुम्रपाण करण्यास बंदी आहे. वरील सर्व नियमांचे व अटींचे काटेकोर पालन केले जाईल.

आदेशावरून

रजि.क्र.

# चंद्रभामा महाविद्यालय

## (कला व विज्ञान)

कर्जत, ता. कर्जत, जि. अ.नगर – ४१४४०२

फोटोसाठी जागा

(For Office use only) **प्रवेश अर्ज २०   – २०**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| Class | Division Admission No. | E.B.C. / B.C. FF / Paying etc. | L.C. or T.C. | Eligibility and mark List | Hostel Fee | College Fee |

(प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारची खाडाखोड चालणार नाही. खाडाखोड झाल्यास नवीन अर्ज वापरावा.)

मा. प्राचार्य,

चंद्रभामा महाविद्यालय, कर्जत, ता. कर्जत, जि.अ.नगर

महाशय,

मी (पूर्ण नाव आडनाव प्रथम) ................................................................

प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष / कला / विज्ञान या वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो / इच्छिते. महाविद्यालयाच्या सर्व नियमांचे मी प्रामाणिकपणे पालन करीन. महाविद्यालयाच्या शिस्तीला व प्रतिष्ठेला बाधक वर्तन मी करणार नाही. माझ्याकडून महाविद्यालयाच्या शांततेने सुरळीत चाललेल्या कामकाजात व्यत्यय आणणारे आणि महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधक ठरणारे वर्तन घडल्यास महाविद्यालय घेईल तो निर्णय मला मान्य राहील. त्यास माझी कोणत्याही प्रकारे तक्रार राहणार नाही. तरी मला महाविद्यालयात प्रवेश घ्यावा ही विनंती.

I hereby submit to the disciplinary jurisdiction of the Vice-Chanecellor and the other officer and authority of the University and the authorities of the college and Institution and small observe and abide by the rules made by the vice-chancellor in the behalf and also by the made by the principal of the college, Head of the institution.

आपला / आपली नम्र

ठिकाण :

दिनांक :   /   /२०

विद्यार्थ्यांची सही

## * विद्यार्थ्यांची व्यक्तीगत माहिती *

१) पूर्ण नाव : देवनागरीत ................................................................

इंग्रजीत (कॅपीटल) ................................................................

२) घरचा कायमचा पत्ता : ................................................................

३) स्थानिक पत्ता : ................................................................

फोन / मोबाईल नं. :

४) जन्म दिनांक : अंकी   /   /   अक्षरी : ................................................................

५) जन्मस्थळ : गाव ........................ ता. ........................ जि. ........................

६) पुर्ण वय (१/७/२०   रोजी) : वर्ष :........................ महिने ........................

७) जात ........................ अनुसूचित जाती / अनु जमाती / भटक्या व विमुक्त जमाती / इतर मागासलेला वर्ग :

८) पुरूष की स्त्री : ........................ ९) विवाहीत / अविवाहीत : ........................

## * मागील परीक्षेची शैक्षणिक माहिती *

| क्रमांक | यापूर्वी शिकत असलेल्या विद्यालय / महाविद्यालयाचे नांव | यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ / विद्यापीठ | परीक्षा केंद्र व परीक्षा क्रमांक | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे महिना व वर्ष | एकूण ठेवलेले गुण | मिळालेले गुण | शेकडा गुण | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

समाज प्रबोधन संस्था संचालित,

| जन. रजि.क्र. | |
|---|---|

# चंद्रभागा महाविद्यालय

(कला व विज्ञान)

कर्जत, ता. कर्जत, जि. अ.नगर - ४१४४०२

फोटोसाठी जागा

(For Office use only) **प्रवेश अर्ज २०   - २०**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| Class | Division Admission No. | E.B.C. / B.C. FF / Paying etc. | L.C. or T.C. | Eligibility and mark List | Hostel Fee | College Fee |

(प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारची खाडाखोड चालणार नाही. खाडाखोड झाल्यास नवीन अर्ज वापरावा.)

मा. प्राचार्य,

चंद्रभागा महाविद्यालय, कर्जत, ता. कर्जत, जि.अ.नगर

महाशय,

मी (पूर्ण नाव आडनाव प्रथम) ..........................................................................

प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष / कला / विज्ञान या वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो / इच्छिते. महाविद्यालयाच्या सर्व नियमाचे मी प्रामाणिकपणे पालन करीन. महाविद्यालयाच्या शिस्तीला व प्रतिष्ठेला बाधक वर्तन मी करणार नाही. माझ्याकडून महाविद्यालयाच्या शांततेने सुरळीत चाललेल्या कामकाजात व्यत्यय आणणारे आणि महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधक ठरणारे वर्तन घडल्यास महाविद्यालय घेईल तो निर्णय मला मान्य राहील. त्यास माझी कोणत्याही प्रकारे तक्रार राहणार नाही. तरी मला महाविद्यालयात प्रवेश घ्यावा ही विनंती.

I hereby submit to the disciplinary jurisdiction of the Vice-Chanecellor and the other officer and authority of the University and the authorities of the college and Institution and small observe and abide by the rules made by the vice-chancellor in the behalf and also by the made by the principal of the college, Head of the institution.

आपला / आपली नम्र

ठिकाण :

दिनांक :   /   /२०

विद्यार्थ्यांची सही

## * विद्यार्थ्यांची व्यक्तीगत माहिती *

१) पूर्ण नाव : देवनागरीत ..........................................................................

इंग्रजीत (कॅपीटल) ..........................................................................

२) घरचा कायमचा पत्ता : ..........................................................................

३) स्थानिक पत्ता : ..........................................................................

फोन / मोबाईल नं. :

४) जन्म दिनांक : अंकी   /   /   अक्षरी : ..........................................

५) जन्मस्थळ : गाव .......................... ता. .......................... जि. ..........................

६) पुर्ण वय (१/७/२०   रोजी) : वर्ष :.......................... महिने ..........................

७) जात .......................... अनुसूचित जाती / अनु जमाती / भटक्या व विमुक्त जमाती / इतर मागासलेला वर्ग :

८) पुरुष की स्त्री : .......................... ९) विवाहीत / अविवाहीत : ..........................

## * मागील परीक्षेची शैक्षणिक माहिती *

| क्रमांक | यापूर्वी शिकत असलेल्या विद्यालय / महाविद्यालयाचे नांव | यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ / विद्यापीठ | परीक्षा केंद्र व परीक्षा क्रमांक | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे महिना व वर्ष | एकूण ठेवलेले गुण | मिळालेले गुण | शेकडा गुण | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

मागील परीक्षेसंबंधी माहिती :-

वर्ग .................... रोल नंबर .................... वर्ष ....................

घेतलेले विषय : १) .................... २) .................... ३) ....................

४) .................... ५) .................... ६) .................... ७) ....................

चालू शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी २०      - २०      निवडलेले विषय

| कला विभाग | विज्ञान विभाग |
|---|---|
| १) .................... | १) .................... |
| २) .................... | २) .................... |
| ३) .................... | ३) .................... |
| ४) .................... | ४) .................... |
| ५) .................... | ५) .................... |
| ६) .................... | ६) .................... |
| ७) .................... | ७) .................... |

## * पालकांची माहिती *

१) पालकाचे पूर्ण नांव (आडनाव प्रथम) ....................

२) घरचा पत्ता ....................

३) नोकरी असल्यास नोकरीचा सध्याचा पत्ता ....................

४) विद्यार्थ्याशी नाते – वडील / आई / भाऊ / किंवा इतर

व्यवसाय .................... ६) वार्षिक उत्पन्न ....................

मी माझ्या पाल्यास या महाविद्यालयात प्रवेश घेण्यास संमती देत आहे. महाविद्यालयाचे सर्व नियम व शिस्त माझ्या पाल्याकडून पाळली जाईल. याकडे मी स्वतः लक्ष घालिन. माझ्या पाल्याने महाविद्यालयाच्या नियमांचे पालन न केल्यास महाविद्यालय त्याच्या संबंधी जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे.

दिनांक :      /      /                                        **पालकाची सही / अंगठा**

---

## * प्राचार्यांचा निर्णय *

श्री/कु. ....................

यास / हिस विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंबंधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पात्रतेचा दाखला () येईपर्यंत प्रथम वर्ष कला / विज्ञान वर्गात तात्पुरता प्रवेश देण्यात येईल / नाही.

२. .................... या वर्गात प्रवेश देण्यात आला आहे. / नाही.

स्थळ : कर्जत

दिनांक :

सदस्य
प्रवेश समिति

लिपीक

**प्राचार्य**
चंद्रभामा महाविद्यालय
कर्जत, ता. कर्जत, जि.अ.नगर

Scanned with OKEN Scanner